अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 05 मार्च 2026 | वर्ष 11 वे | अंक 29 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## ब्रम्हपुरी न.प.चा बजेट म्हणजे 'कॉपी-पेस्ट' प्रकार

### जनतेच्या अपेक्षांवर पाणी फेरले; नगरसेवक मनोज भुपाल यांचा पत्र परिषदेत घणाघाती आरोप

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत नवनिर्वाचित नगरसेवक मनोज भूपाल यांनी ब्रम्हपुरी नगरपालिकेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली आहे. हे बजेट ब्रह्मपुरीकरांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारे असून केवळ 'कॉपी-पेस्ट' करून सादर करण्यात आले आहे, असा गंभीर आरोप त्यांनी यावेळी केला. या पत्रकार परिषदेला माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांची प्रमुख



उपस्थिती होती.

मनोज भूपाल यांनी अर्थसंकल्पातील त्रुटींचा पाढा वाचताना म्हटले की, आरोग्य सुविधा व साथीच्या रोगांसाठी केवळ २५ लाखांची तरतूद करण्यात आली आहे, जी किमान १ कोटी असणे आवश्यक होते. तसेच नाली उपसा व स्वच्छतेसाठी मागील वर्षी १.६८ कोटी असताना यावर्षी ही रक्कम १.५० कोटींपर्यंत कमी का करण्यात आली? शहरातील ग्रीन जिम आणि खेळणी दुरुस्तीसाठी ३ लाखांची तरतूद अत्यंत तोकडी असून, त्याठिकाणी २० लाखांची गरज आहे. मागील वर्षी वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी ७२ लाख आणि सौंदर्यीकरणासाठी ५९.६१ लाखांची तरतूद होती. मात्र, यावर्षी या दोन्ही महत्त्वपूर्ण विषयांसाठी 'शून्य' तरतूद दाखवून विकासकामांना खिळ घालण्यात आली आहे. भूपाल यांनी पुढे सांगितले की, मालमत्ता कराच्या दरात सुधारणा करून नगरपरिषद ब्रह्मपुरीकरांवर अतिरिक्त कराचा बोजा टाकत आहे, जे सध्याच्या स्थितीत अयोग्य आहे.

तसेच, विधानसभा निवडणुकीदरम्यान आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांनी मौजा बोंडेगाव परिसरात औद्योगिक क्षेत्रासाठी जागा राखीव ठेवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, काँग्रेसची सत्ता असूनही डी.पी. प्लॅनमध्ये याबाबत कोणतीही हालचाल झालेली नाही. हे शहरातील औद्योगिक विकासाकडे केलेले दुर्लक्ष असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच राजीव गांधी सभागृह बी.पी.एल. धारकांना ५०% सवलतीत मिळावे. व गटर

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## ब्रम्हपुरी जिल्ह्याच्या मागणीसाठी नागरिकांचा ऐतिहासिक एल्गार

### ४४ वर्षांचा वनवास संपविण्यासाठी परिसरातील जनतेची तहसिलवर धडक

ब्रह्मपुरी/का.प्र.

विदर्भाच्या राजकारणात आणि प्रशासकीय नकाशावर महत्त्वाचे स्थान असलेल्या ब्रम्हपुरीला जिल्ह्याचा दर्जा मिळावा, या मागणीसाठी शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी ब्रम्हपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली एक अभूतपूर्व विराट मोर्चा काढण्यात आला. १९८२ पासून सुरू असलेली ४४ वर्षांची प्रदीर्घ प्रतीक्षा आता संपवा, असा स्पष्ट इशारा देत ब्रम्हपुरीकरांनी प्रशासकीय यंत्रणेला चांगलेच हादरवून सोडले.

'ब्रम्हपुरी जिल्हा झालाच पाहिजे', 'आमच्या



हक्काचा जिल्हा मिळालाच पाहिजे' अशा गगनभेदी घोषणा देत जिल्हाप्रेमींची ही लाट उपविभागीय अधिकारी (SDO) कार्यालयावर धडकली. या आंदोलनातून जनतेचा संताप आणि निर्धार दोन्ही स्पष्टपणे दिसून आले. केवळ निवेदन देऊन न थांबता, यावेळी तहसील आवारात एक विशेष सभा घेण्यात आली.

**१९८२ चा तो 'अन्याय' आणि इतिहास** : सभेला संबोधित करताना विनोदभाऊ झोडगे, डॉ. देविदास जगनाडे, हरिश्चंद्रजी चोले यांच्यासह अन्य वक्त्यांनी १९८२ च्या इतिहासाची आठवण करून दिली. त्याकाळी ब्रम्हपुरी जिल्हा घोषित झाला होता, मात्र राजकीय खेळीमुळे ब्रम्हपुरीऐवजी गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती झाली. गेल्या चार दशकांपासून ब्रम्हपुरीकर हा अन्याय सहन करत आहेत, पण आता ही लढाई आरपारची असेल, अशी आक्रमक भूमिका वक्त्यांनी मांडली.

संघर्ष समितीने केवळ मुख्यमंत्र्यांना निवेदन न देता, लोकशाहीच्या सर्व स्तरांवरून सरकारवर दबाव निर्माण करण्याची रणनीती आखली आहे. विधानसभा स्तरावर आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत 'तारांकित प्रश्न' उपस्थित करून सरकारला जाब विचारावा, अशी विनंती करण्यात आली. नगर परिषद विशेष सभेत जिल्हा निर्मितीचा ठराव एकमताने मंजूर करण्याचे आवाहन नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना केले. ग्रामपंचायत स्तरावर तालुक्यातील प्रत्येक ग्रामसभेत जिल्हा निर्मितीचा ठराव घेऊन तो राज्य सरकारकडे पाठवण्याबाबत गटविकास अधिकारी (BDO) घुबडे यांना सूचित करण्यात आले. आता हा लढा केवळ निवेदनापुरता मर्यादित नसून तो ब्रम्हपुरीच्या अस्मितेचा आणि भावी पिढीच्या भविष्याचा प्रश्न बनला आहे. ४४ वर्षांची प्रतीक्षा संपवून ब्रम्हपुरीला जिल्ह्याचा मान मिळेपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

या ऐतिहासिक आंदोलनाचे नेतृत्व मुख्य निमंत्रक विनोदजी झोडगे यांनी केले. यावेळी प्रा. सुयोग बाळबुद्धे, पवन जैस्वाल, अंकज कानझोडे, मनोज भूपाल, डॉ. बाळकृष्ण शेळके, लिलाधर झलके, तुकाराम करंडे, ईश्वर प्रधान, प्रवीण गेडाम, अशोक जिभकाटे, जनार्दन कावळे, धर्मपाल राहाटे, मधुकर सहारे यांच्यासह शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संपादकीय...

# ईराण-अमेरिका युध्दाची धग

जग पुन्हा एकदा अस्थिरतेच्या उंबरठ्यावर उभे आहे. स्वत:ला 'शांततादूत' म्हणवणारे डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेन्जामिन नेतन्याहू यांच्या आक्रमक धोरणांमुळे पश्चिम आशियातील संघर्षाने धगधगते रूप धारण केले आहे. अमेरिका ठरवते ती लोकशाही आणि अमेरिकेला वाटते तो दहशतवाद हया एकतर्फी निकषांवर जगाची राजकीय मांडणी करण्याची सवय वॉशिंग्टनला जुनीच आहे. पण या वेळची परिस्थिती अधिक धोकादायक ठरू शकते, कारण लक्ष्य आहे इराणसारखे प्रादेशिक महासत्ता बनण्याच्या उंबरठ्यावर असलेले राष्ट्र इराणच्या अणू कार्यक्रमावरून चर्चा फिस्कटल्यानंतर इस्त्रायल आणि अमेरिकेने थेट आक्रमणाचा मार्ग स्वीकारला. या कारवाईत इराणचे सर्वोच्च नेते खामेनेई यांच्या अधिकृत कार्यालयावर हल्ले झाल्याच्या बातम्या समोर आल्या. अमेरिकेचे खरे लक्ष्य खामेनेई यांनाच सत्तेवरून हटवणे होते, असे संकेत स्पष्टपणे दिसतात.

'लोकशाही' च्या नावाखाली शासनबदल घडवून आणण्याचा अमेरिकेचा इतिहास नवीन नाही; मात्र अशा हस्तक्षेपांनी दीर्घकालीन स्थैर्य निर्माण झालेले उदाहरणे फारच कमी आहेत. १९८९ पासून इराणच्या राजकारणावर आणि धार्मिक नेतृत्वावर प्रभावी नियंत्रण ठेवणाऱ्या खामेनेई यांनी इस्लामिक रिपब्लिकची दिशा ठरवली. रिव्होल्युशनरी गार्ड्सच्या बळावर अंतर्गत विरोध दडपणे, अमेरिकाविरोधी आणि इस्रायलविरोधी परराष्ट्र धोरण कायम ठेवणे आणि अणू कार्यक्रमाला गती देणे हया तिन्ही बाबतीत त्यांची भूमिका ठाम होती. लेबनॉन, सीरिया, इराक आणि येमेन या पट्ट्यात इराणचा प्रभाव वाढवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळेच ते अमेरिकेला इराणचा क्रमांक एकचा शत्रू म्हणत आणि इस्रायलविरोधी भूमिका उघडपणे मांडत.

इराणचा दावा कायम असा राहिला की त्यांचा अणू कार्यक्रम नागरी उद्देशांसाठी आहे; अण्वस्त्रनिर्मितीचा त्यांचा कोणताही मानस नाही. मात्र इस्रायलला हा दावा कधीही पटला नाही. इस्रायलच्या सुरक्षेच्या दृष्टीने इराणचा अणू कार्यक्रम अस्तित्वाचा प्रश्न मानला जातो. त्यामुळे इस्त्रायलसाठी खामेनेई यांना लक्ष्य करणे हा धोरणात्मक विजय मानला जाऊ शकतो. पण व्यक्तीचा अंत म्हणजे विचारसरणीचा अंत होत नाही. खामेनेई गेले, तरी इराणमधील कट्टर गट अधिक आक्रमक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संघर्षाचे परिणाम केवळ पश्चिम आशियापुरते मर्यादित राहणार नाहीत. जागतिक तेलबाजार, सामरिक आघाड्या आणि महासत्तांमधील समीकरणे या सर्वांवर त्याचा परिणाम होईल. रशिया आणि चीनसारख्या देशांनी इराणला पाठिंबा दर्शवला, तर संघर्षाचे स्वरूप व्यापक होऊ शकते. तिसऱ्या महायुद्धाच्या छायांची चर्चा उगाच नाही; कारण प्रादेशिक युद्धे अनेकदा जागतिक शक्तींना ओढून घेतात. ट्रम्प यांनी 'मी हे युद्ध थांबवले, ते युद्ध थांबवले' अशी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला असला, तरी सध्याची परिस्थिती त्यांच्या त्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे करते. शांततेचे नोबेल मिळवण्याची महत्त्वाकांक्षा आणि प्रत्यक्ष कृतीतील आक्रमकता यातील विरोधाभास प्रकर्षाने जाणवतो. नेतन्याहू यांच्यासाठीही हा संघर्ष अंतर्गत राजकारणातील दबाव कमी करण्याचे साधन ठरू शकतो. युद्धाचा भडका पेटवणे सोपे असते; पण तो विझवणे अत्यंत कठीण. खामेनेई यांच्या संभाव्य मृत्यूची बातमी जर अधिकृतरीत्या इस्रायली कारवाईशी जोडली गेली, तर इराणकडून तीव्र प्रतिहल्ल्याची शक्यता आहे. अशा वेळी मध्यस्थी, संयम आणि बहुपक्षीय संवाद हाच एकमेव मार्ग ठरू शकतो. अन्यथा, एका नेत्याच्या अंताने सुरू झालेला संघर्ष संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या खाईत ढकलू शकतो.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# माय मराठीचा सन्मान आणि संवर्धन करा

## प्राचार्य डॉ. शेकोकर : मराठी भाषा गौरवदिनी प्रतिपादन

ब्रह्मपुरी/का.प्र.

'आज बारा कोटी लोकं मराठी बोलतात. व्यक्त होण्यासाठी मातृभाषा कामात येते. मराठीतले



समृद्ध साहित्य वाचा. कवी कुसुमाग्रज हे मानवतावादी कवी होते. त्यांच्या कविता आजही मनपटलावर आहेत. त्यांची जयंती आहे. अनेक कवी, लेखकांनी आपल्या मातृभाषेची मान उंचावण्याचा प्रयत्न केला. आपणही माय मराठीचा सन्मान करुन तिचे संवर्धन करा!' असे आवाहन प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी केले. ते ने.हि. महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'मराठी भाषा गौरवदिन' कार्यक्रमात अध्यक्षपदावरून बोलत होते.

विचारपीठावर डॉ राजेंद्र डांगे, कवी व विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर, डॉ मोहन कापगते, डॉ युवराज मेश्राम, डॉ पद्माकर वानखडे उपस्थित होते. यावेळी माय मराठीवर सर्वांनी भाष्य केले. प्रास्ताविक भाषण विभागप्रमुख डॉ.धनराज खानोरकरांनी, संचालन व आभार प्रदर्शन डॉ.पद्माकर वानखडेंनी केले. कार्यक्रमाला डॉ असलम शेख, डॉ सुनिल चौधरी, डॉ मिलिंद पठाडे, डॉ राजू आदे व बहूसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

जल है तो कल है...

# घरकुल योजनेचे ४ वर्षापासून अनुदान रखडले

## विनोद झोडगे यांच्या नेतृत्वात पं.स.वर धडक

### १६६ लाभार्थी संकटात



ब्रम्हपुरी/का.प्र.

सरकारने गरिबांना हक्काचे घर देण्यासाठी 'घरकुल योजना' राबवली खरी, मात्र त्याचे अनुदान देताना शासनस्तरावर होत असलेल्या दिरंगाईमुळे लाभार्थ्यांना आता मानसिक आणि आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ब्रह्मपुरी तालुक्यातील आवळगाव येथील तब्बल १६६ लाभार्थ्यांचे अनुदान गेल्या ४ वर्षांपासून रखडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे त्यांच्यावर कर्जबाजारी होण्याची पाळी आली आहे.

सन २०२१ पासून आवळगाव येथील या १६६ कुटुंबांना घरकुल मंजूर झाले. अनेकांनी आपल्या घरांची कामे पूर्णही केली आहेत. घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांनी उसनेवारी करून, व्याजाने पैसे काढून किंवा सिमेंट-लोखंडाची उधारी करून घराचे बांधकाम पूर्ण केले. शासनाचे हप्ते जमा झाले की उधारी फेडू, या आशेवर असलेल्या या गरिबांना २०२१ पासून अद्याप थकीत रक्कम मिळालेली नाही. परिणामी, हे सर्व लाभार्थी सध्या मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडले आहेत.

संबंधित विभागाकडे यापूर्वी अनेकदा निवेदने देण्यात आली, तक्रारी करण्यात आल्या; मात्र प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे. १६६ लाभार्थ्यांचे हक्काचे पैसे का रखडले? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. लाभार्थ्यांची ही व्यथा जाणून घेण्यासाठी शेतकरी नेते विनोद झोडगे यांनी आवळगाव येथे प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी सर्व घरकुल धारकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. प्रशासनाच्या या आडमुठ्या धोरणाविरोधात कॉ. झोडगे यांनी आक्रमक भूमिका घेत लाभार्थ्यांसह पंचायत समिती कार्यालय वर धडक देत निदर्शने केली व रवींद्र घुबडे गट विकास अधिकारी यांना निवेदन देऊन चर्चा केली.

'जर १६६ लाभार्थ्यांची थकीत रक्कम त्वरित दिली नाही, तर येणाऱ्या काळात जिल्हाधिकारी कार्यालय समोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,' असा इशारा विनोद झोडगे यांनी निवेदनातून प्रशासनाला दिला आहे. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर सातपुते, शशिकांत वार्जुकर, विनोद मेश्राम, अमोल बावणे, संजय मेश्राम, उषा दुमाने, अशोक लोळे, गणपत दूमाने, केवळ भोयर, गजानन आवारी, महेश दूमाने, यशवंत तिवाडे यासह घरकुल लाभार्थी उपस्थित होते.

### 😂 विनोदिनी 😂

पप्पू ने गली के कोने में कचरा फेंक दिया !
थोड़ी देर बाद वो घूम फिर कर उसी गली में ही वापस आया...
तो मोहल्ले की महिलाओं में जोर से झगड़ा चल रहा था...
वो दोनों आपस में इसलिए लड़ रही थी कि, दोनों के घरों के कोने में कचरा किसने फेंका...!
झगड़ा करते वक्त एक औरत ने गुस्से से कहा - 'फेंका होगा किसी कुत्ते के बच्चे ने..!'
यह देख...
पप्पू हंसा और बोला - 'कचरा मैंने फेंका और नाम कुत्ते के बच्चे का आ गया...!!

# रक्तदानासारखे दुसरे सर्वश्रेष्ठ दान कोणतेच नाही - अशोक भैया

## राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी. व शारीरिक शिक्षण विभागाचे संयुक्त भव्य रक्तदान शिबीर




ब्रम्हपुरी/का.प्र.

"रक्तदान' यासारखे दुसरे सर्व श्रेष्ठ दान कोणतेच नाही. एखाद्या गरजु रुग्णाचे प्राण वाचविण्याचे कार्य रक्तादानातून होत असते. खरे तर रक्तदाता हाच भगवान व देव ठरतो. आज रक्तदानाविषयी युवकात जागृती होणे काळाची गरज आहे. रक्तदान केल्याने शरीरातील रक्त कमी होत नाही. उलट आपले शरीर ते चोविस तासात भरुन काढते. रक्तदान करणे हे एक प्रकारे पुण्य प्राप्त करणे आहे आणि म्हणून रक्तदान हेच सर्व श्रेष्ठ दान आहे," असे मौलिक विचार अशोक भैया यांनी रक्तदान शिबीर व पारितोषिक वितरण कार्यक्रमात व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी तथा शांताबाई भैया महिला महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी. व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी विचारपीठावर कार्यक्रमाचे उद्घाटक अशोकजी भैया सचिव नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. एस.एम. शेकोकर यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस एम वरभे प्राचार्य, शांताबाई भैया महिला महाविद्यालय, मेजर विनोद नरड, डॉ प्रकाश वट्टी, डॉ के के गील, प्रा अभिजित परकरवार व डॉ अभिमन्यू पवार इ. मान्य. उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉं शेकोकर यांनी रक्तदान शिबीराचे महत्व पटवून दिले. यावेळी काही विद्यार्थ्यांचे मत जाणून घेतले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमात नियमित व शिबीरात सक्रीय सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. याकार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय डॉ प्रकाश वट्टी यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ अभिमन्यू पवार आणि आभार प्रदर्शन डॉ प्रतिभा कढव यांनी केले. कार्यक्रमाला डॉ धनराज खानोरकर, डॉ मोहन कापगते, डॉ आर के डांगे, डॉ युवराज मेश्राम, डॉ दर्शना उराडे, डॉ हर्षा कानफाडे, डॉ वर्षा चापके, अभिमन्यू पठाडे व डॉ वानखडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोपाल करंबे, संजू मेश्राम, अनिकेत शेंडे, मानस गेडाम, गणेश धनजुले, चिन्मयी मडावी, रोहिणी वाघाडे व सर्व रासेयो स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले.

# स्वातंत्र्यवीर सावरकर क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान

## स्वा. सावरकर पुण्यतिथी कार्यक्रमात समीक्षा पंडित यांचे प्रतिपादन

ब्रह्मपुरी/का.प्र.

'स्वातंत्र्यवीर सावरकर यांना झालेली जन्मठेप म्हणजे भारतीय जनतेला त्यांच्यापासून दूर ठेवण्याचे षडयंत्र होते. सावरकरांच्या सहवासात जो आला तो त्यांच्या विचारांनी, कार्यानी भारावून जात असे. ही गोष्ट ब्रिटिश अधिकाऱ्यांनी ओळखली होती. ५० वर्षांची ही शिक्षा म्हणजे त्यांना अंदमानातच मृत्यू यावा, हा त्यांचा उद्देश होता, असे प्रतिपादन समीक्षा पंडित यांनी केले. सावरकर उत्सव समिती व भारतीय विचार मंच यांच्या वतीने येथील स्वा. सावरकर चौकात २७फेब्रुवारीला स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी उत्सव समितीचे संयोजक वामन भुसारी मंचावर उपस्थित होते.

पंडित पुढे म्हणाल्या, ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करणाऱ्यांमागे सावरकर आहेत, असा गुन्हा नोंदवून शस्त्र बाळगणे, साहित्य पुरवणे, लोकांना भाषणातून चिथावणी देणे या कारणांसाठी त्यांना अंदमानला दोन जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तरीही माफिवीर म्हणून सावरकरांना हिणवले जाते. सावरकरांनी ब्रिटिश सरकारपुढे माफी कधीच मागितली नाही. ब्रिटिश कायद्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता. आपल्या शिक्षेचा कालावधी कमी व्हावा व आपल्याला आपल्या देशातील, आपल्या मातृभूमीतील तुरुंगात ठेवण्यात यावे, ही विनंती त्यांनी केली होती. मातृभूमी विषयीचे हे प्रेम होते. परंतु, त्याचा वेगळा अर्थ काढून काही नतद्रष्ट त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. स्वातंत्र्यलढ्यातील आपल्याला झालेल्या वेदना, कष्ट याविषयी ते कधीच बोलले नाहीत.

तुरुंगात असताना त्यांना स्फुरलेले काव्य, साहित्य त्यांनी मुखोद्ध केले होते. या सर्व साहित्याबद्दलही त्यांनी विचार व्यक्त केले. त्यांच्या अखंड भारताची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणे ही त्यांना खरी श्रद्धांजी ठरेल, ही भावना त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक व परिचय जिल्हा संयोजक राजेश देऊरकर यांनी केले. वैयक्तिक गीत प्रतिभा नानोटी यांनी गायिले. संचालन जयंत पिंपळापुरे यांनी केले.

# मराठी राजभाषा गौरव दिन साजरा

नागभीड/प्रतिनिधी

दि. २७/०२/२०२६ रोजी सरस्वती जैरामजी तर्वेकर महिला महाविद्यालय, नागभीड येथे मराठी राज्यभाषा गौरव दिन तसेच ज्येष्ठ साहित्यिक कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर तसेच सचिव अजय काबरा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रेखा जिभकाटे होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रास्ताविकात मराठी भाषेचे महत्त्व, तिची समृद्ध परंपरा आणि जागतिक स्तरावर वाढत असलेले योगदान याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. प्राचार्या डॉ. रेखा जिभकाटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, 'मराठी ही केवळ भाषा नसून आपली ओळख, संस्कृती आणि अस्मिता आहे. विद्यार्थिनींनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून तिच्या जतन व संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा.' तसेच कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्य कार्याचा गौरव करत विद्यार्थिनींना वाचन संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यार्थिनींनी कविता वाचन, भाषण स्पर्धा आणि मराठी भाषेवर आधारित विविध सांस्कृतिक सादरीकरणे करून कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दुपारे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सपना वैद्य यांनी केले. कार्यक्रमाची सांगता मराठी राजभाषा गौरव गीताने करण्यात आली.

# बँक ऑफ महाराष्ट्रची नान्होरी शाखा हलविण्याचा घाट

## शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा ठिय्या आंदोलनाचा इशारा

ब्रह्मपुरी/का.प्र.

गेल्या ४० वर्षांपासून ग्रामीण भागातील अर्थवाहिनी ठरलेली बँक ऑफ महाराष्ट्रची नान्होरी (ता. ब्रह्मपुरी) शाखा ब्रह्मपुरी शहरात स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. प्रशासनाच्या या निर्णयामुळे परिसरातील १० गावांमधील नागरिक, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, हे स्थलांतर रद्द न झाल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे तीव्र 'ठिय्या आंदोलन' करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

नान्होरी येथील या शाखेत केवळ नान्होरीच नव्हे, तर दिघोरी, तोरगाव (खुर्द), तोरगाव (बुज), बेलगाव, देऊळगाव, तपाल, कोलारी, नांदगाव आणि कालेता अशा सुमारे १० गावांतील हजारो नागरिकांची खाती आहेत. या परिसरात दुसरी कोणतीही राष्ट्रीयकृत बँक नसल्याने ही शाखा ग्रामीण जनतेसाठी एकमेव आधार आहे. शाखा स्थलांतरित झाल्यास वृद्ध पेन्शनधारक आणि शेतकऱ्यांना साध्या कामासाठीही लांबचा प्रवास करावा लागणार आहे.

शिवसेनेच्या शिष्टमंडळाने यासंदर्भात बँक ऑफ महाराष्ट्रचे अंचल प्रबंधक (चंद्रपूर) यांना ब्रह्मपुरी शाखा प्रबंधकांमार्फत निवेदन सादर केले. या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, बँकेचा हा निर्णय लोकहितविरोधी असून तो तात्काळ मागे घ्यावा. यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रा. अमृत नखाते, विधानसभा प्रमुख रामेश्वर राखडे, उपतालुकाप्रमुख गणेश बागडे, उपतालुकाप्रमुख सुमंत वैरागडे, आणि विभाग प्रमुख लीलानंद ढोरे यांच्यासह अनेक शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते. या निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यालय (पुणे) आणि नान्होरी शाखा व्यवस्थापकांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

# ब्रम्हपुरी परिसरात रेती माफियांविरोधात महसूल विभागाचा 'सर्जिकल स्ट्राईक'

## तक्रारदारच निघाला रेती तस्कर

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि रेती तस्करीने डोके वर काढले असतानाच, तहसीलदार सतीश मासाळ यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाने धडक मोहीम उघडली आहे. या मोहिमेत एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, रेती तस्करी थांबवण्यासाठी तहसीलदारांना निवेदन देणारा तक्रारदारच स्वतः अवैध रेती वाहतूक करताना रंगेहात पकडला गेल्याने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.

दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मौजा कुर्झा येथे अवैध रेती उपसा आणि वाहतूक सुरू असल्याची गुप्त माहिती प्रशासनाला मिळाली. तहसीलदार सतीश मासाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने तातडीने सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत रेतीची अवैध वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. तपासाअंती सदर वाहन कुर्झा वॉर्ड, ब्रह्मपुरी येथील रहिवासी सौरभ अनिल रामटेके यांच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईतील सर्वात चर्चेचा विषय म्हणजे सौरभ रामटेके यांची पार्श्वभूमी. काही दिवसांपूर्वीच रामटेके यांनी स्थानिक नागरिकांच्या सह्या गोळा करून अवैध रेती तस्करी थांबवण्याबाबत तहसील कार्यालयात निवेदन दिले होते. रेती तस्करी विरोधात सार्वजनिकरित्या भूमिका मांडणारी आणि प्रशासनाकडे कारवाईची मागणी करणारी व्यक्तीच आता स्वतः तस्करीच्या जाळ्यात अडकल्याने 'बोले तैसा न चाले' अशी त्यांची अवस्था झाली आहे. या प्रकारामुळे परिसरात 'दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे' अशी चर्चा रंगली आहे.

**'पर्यावरण संरक्षण आणि शासकीय महसुलाची चोरी रोखण्यासाठी आमची मोहीम अधिक तीव्र केली जाईल. कोणताही मुलाहिजा न ठेवता अवैध उपसा करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनी अशा प्रकारांची माहिती प्रशासनाला देऊन सहकार्य करावे.'**

**–सतीश मासाळ, तहसीलदार, ब्रह्मपुरी**

महसूल विभागाने आपला मोर्चा केवळ कुर्झापुरता मर्यादित न ठेवता पूर्ण तालुक्यात विस्तारला आहे. दोन दिवसांपूर्वीच बेलपातळी येथील प्रफुल सहादेव मेश्राम यांचाही अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पथकाने जप्त केला होता. ही दोन्ही वाहने सध्या तहसील कार्यालयाच्या आवारात जमा करण्यात आली असून संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रशासनाच्या या कुर्झा येथील कारवाई मोहिमेत ग्राम महसूल अधिकारी भूपेन गौरे, महसूल सेवक धनपाल बोरघरे व कर्मचारी तर बेलपातळी येथील कारवाईत ग्राम महसूल अधिकारी चंद्रकांत ठाकरे, घनश्याम राऊत आणि तुषार गिरडकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध रेती तस्करांचे धाबे दणाणले आहेत. केवळ कागदोपत्री तक्रारी करून स्वतः अवैध धंदे करणाऱ्यांनाही या कारवाईतून मोठा धडा मिळाला आहे. येणाऱ्या काळात रेती तस्कारांवर कठोर कारवाई होणार हे निश्चित.

# ट्विंकल स्कुल नागभीड येथे मराठी भाषा दिन साजरा

नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल इंग्लिश स्कूल, नागभीड येथे दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी राज्यभाषा गौरव दिन तसेच कुसुमाग्रज जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. तसेच दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दि. २७ फेब्रुवारी रोजी झालेल्या कार्यक्रमात मराठी भाषेचे महत्त्व आणि समृद्ध साहित्य परंपरेचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्राचार्या शुभांगी पोहेकर व मुख्याध्यापिका संगीता नारनवरे उपस्थित होत्या. शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनाचा संकल्प व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन, भाषणे व मनोगत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मराठी भाषा ही आपली ओळख असून तिचा अभिमान बाळगणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

दि. २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विविध विज्ञान प्रयोगांचे प्रात्यक्षिक, विज्ञान विषयक पोस्टर सादरीकरण व मार्गदर्शनपर भाषणे आयोजित करण्यात आली. विज्ञानामुळे देशाची प्रगती साध्य होते तसेच विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासावा, असे आवाहन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर व सचिव अजय काबरा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषा, साहित्य, विज्ञान व संस्कृतीविषयी प्रेम आणि अभिमानाची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल.

❀❀❀❀❀❀

# ने.हि. महाविद्यालयाच्या गृहअर्थशास्त्र विभागाची कोसा सिल्क उद्योगाला क्षेत्रभेट

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी च्या गृहअर्थशास्त्र



विभागाच्या पदवी, पदव्युत्तर व फॅशन डिझाइनिंग विभागातर्फे गजराज कोसा सिल्क उद्योग, मोहाडी (महालगाव) जि. भंडारा येथे भेट देण्यात आली.

याात साहभाागाी विद्यार्थीनींना रेशीम प्रक्रीयेअंतर्गत रेशमाच्या कोसा, अंडी, अळी पासून रेशमी धागा तयार करण्याची प्रक्रिया व धाग्यापासून वस्त्रनिर्मिती साडी, शाल, दुपट्टे तयार करण्यापर्यंतची प्रक्रीया विद्यार्थीनी प्रत्यक्षदर्शी अनुभव प्राप्त झाला, ही संपूर्ण प्रक्रीया व त्यांच्या मार्केटिंगपर्यंतची माहिती व्यवस्थापक रामकृश्ण सोनकुसरे यांनी विद्यार्थिनींना दिली. त्यांनी अगदी सोप्या भाषेत व व्यहारातील उदाहरणे देत माहिती दिली. यातून एक चांगली अनुभूती विद्यार्थीनींना मिळाली.

यामध्ये गृहअर्थशास्त्र पदवी व पदव्युत्तर विभाग तसेच फॅशन डिझाइनिंग प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीनींनी सक्रीय सहभाग घेतला. विभागातील प्रा.डॉ. सोनाली पारधी (प्रधान), डॉ. अनिता बगमारे, प्रा. शितल पांचाळ, प्रा. अस्मा खान यांच्या मार्गदर्शनात ही शैक्षणिक भेट यशस्वीरित्या पार पडली.

# षष्टम पंचगव्य चिकित्सा शिबीर व संमेलन संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक २३ ते २६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान भू वैकुंठ



अड्याळ टेकडी येथे विदर्भस्तरीय 'षष्ठम पंचगव्य चिकित्सा संमेलन' उत्साहात पार पडले. गोवंश रक्षण, पंचगव्य चिकित्सा आणि स्वावलंबी जीवनशैलीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात विदर्भासह इतर राज्यांतील जिज्ञासूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रामुख्याने गव्यसिद्धाचार्य डॉ. निरंजन वर्मा (चेन्नई) आणि सुबोध दादा (संचालक, अड्याळ टेकडी) यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच हेमंतजी शेटे गुरुजी (आचार्य) आणि डॉ. झांबरे सर (अॅक्युपंक्चर तज्ज्ञ) यांनी तांत्रिक विषयांवर मार्गदर्शन केले. सोबतच आदित्य संगीडवार, तुकडीदास उरकुडे, दीपक भांडेकर, सुभाषजी वाडीभस्मे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरासाठी भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नाशिक, अकोला, वर्धा, यवतमाळ, नागपूर, रायगड आणि अगदी कोलकाता येथूनही प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. डॉ. निरंजन भाई वर्मा यांनी गोमाता विज्ञान व इतिहास, पंचगव्याचा औषधी उपयोग इत्यादी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. सुबोध दादा यांनी ग्रामगीतेवर आधारित दिनचर्याआणि अड्याळ टेकडीचा इतिहास सांगितला.

शिबिरार्थींना प्रत्यक्ष उत्पादने बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यात आरोग्य व स्वच्छता: गोमूत्र घनवटी, मंजन, फेसपॅक, उटणे, शाम्पू, मालिश तेल, नस्य व कर्ण औषधी, नेत्र औषधी, अमृतधारा. शेती व इतर बाबतीत प्राकृतिक शेती, शेणापासून खत निर्मिती, जीवामृत, गोमय भस्म, गोमय लेप, धूप आणि विविध सरबत निर्मिती शिकविण्यात आली. सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आयोजक, प्रशिक्षक आणि मार्गदर्शकांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानण्यात आले. गो–सेवेचा आणि स्वावलंबनाचा संकल्प करून या यशस्वी कार्यक्रमाची सांगता झाली.

# एनएमएमएस परीक्षेत नेवजाबाई हितकारिणी विद्यालयाचे घवघवीत यश

## ४१ यशस्वी विद्यार्थ्यांसह पालकांचा सत्कार समारंभ संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रह्मपुरी येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून यात तब्बल ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हे यश शाळेची सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्ता व गुणवंत विद्यार्थ्यांना दिले जाणारे मार्गदर्शन अधोरेखित करणारे आहे. या यशानिमित्त शाळेत यशस्वी विद्यार्थ्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या यशाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक नाईक सर यांच्या सुनियोजित नियोजन व प्रभावी शैक्षणिक मार्गदर्शनाला देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक ए.डब्ल्यू. नाकाडे हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थी व पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून शालेय पर्यवेक्षक पी.आर. जिभकाटे उपस्थित होते. तसेच जेष्ठ शिक्षक वदनलवार सर आणि रतिराम चौधरी सर, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा क्रमांक ४ ब्रह्मपुरी, यांनी कार्यक्रमाला विशेष उपस्थिती दर्शविली. मार्गदर्शनपर भाषणात चौधरी सर यांनी NMMS परीक्षा ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देणारी असून त्यांच्या उच्च शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले. धांडे सर यांनी शिष्यवृत्ती योजनेची सविस्तर माहिती देत पात्रता अटी व आवश्यक कागदपत्रांविषयी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये शिष्यवृत्ती प्रमुख अनुराग देशमुख सर यांचे विशेष योगदान लाभले. त्यांनी बुद्धिमत्ता चाचणी (Mental Ability Test – MAT) साठी विद्यार्थ्यांची विशिष्ट, नियोजनबद्ध व परिणामकारक पद्धतीने तयारी करून घेतली, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या तर्कशक्ती व आत्मविश्वासात लक्षणीय वाढ होऊन उत्कृष्ट निकाल साध्य झाला. त्यांना नीता महाजन मॅडम, विलास करंबे सर, शिवानी कुथे मॅडम, माया कापगते मॅडम व कलकोटवार मॅडम यांनी मोलाचे सहकार्य करून विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमाचे संचालन नीता महाजन मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन माया कापगते मॅडम यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव अशोकजी भैया तसेच संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांचे मनोबल वाढले. या उल्लेखनीय यशामुळे नेवजाबाई हितकारिणी विद्यालयाचा नावलौकिक वाढला असून शैक्षणिक क्षेत्रातून या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वैनगंगेच्या पात्रातील पार्टी बेतली जीवावर, दोघे बुडाले

ब्रह्मपुरी/का.प्र.

मित्रांसोबत नदीकाठी पार्टी करण्यासाठी गेलेल्या दोन युवकांचा वैनगंगा नदीच्या पात्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. ही धक्कादायक घटना ०१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास ब्रह्मपुरी तालुक्यातील खरकाडा येथे घडली. शुभम विजय सहारे (१९) आणि शुभम पुष्पराज बगमारे (२४) अशी वाहून गेलेल्या युवकांची नावे आहेत. त्या दोन्ही मुलांचे मृतदेह दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजता नदीपात्रात सापडले.

मिळालेल्या माहितीनुसार, खरकाडा गावातील ७ ते ८ मित्र रविवारी सुटीचा आनंद घेण्यासाठी वैनगंगा नदीच्या काठावर गेले होते. जेवणाचा बेत नदीच्या पलीकडे असलेल्या कोंढाळा गावाच्या बाजूला आखण्यात आला. सर्वांचे जेवण आटोपल्यानंतर सायंकाळच्या सुमारास परतत असताना पिंपळगाव-खरकाडा हद्दीतील नदीपात्रात काही मित्रांनी आंघोळीचा मोह आवरता आला नाही. शुभम सहारे, शुभम बगमारे यांच्यासह राज सहारे आणि गौरव वाघधरे हे चौघेही आंघोळीसाठी नदीत उतरले. मात्र, या ठिकाणी खोल डोह असल्यामुळे पाण्याचा अंदाज आला नाही आणि चौघेही बुडू लागले. यावेळी उपस्थित इतर मित्रांनी प्रसंगावधान राखून राज आणि गौरव या दोघांना सुखरूप बाहेर काढले, मात्र दोन्ही 'शुभम' पाण्यात बुडू लागले. ०२ मार्चला दुपारी ३ वाजता दोघांचेही मृतदेह वैनगंगा नदीपात्रात सापडले. मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरीय तपासणी साठी ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी येथे आणण्यात आले. पुढील तपास ब्रम्हपुरी पोलिस करीत आहेत.

❁❁❁❁❁❁

# एलएमबी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची नगर परिषदेला शैक्षणिक भेट



ब्रम्हपुरी का/प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये दि. ११ फेब्रुवारी २०२६ ला इयत्ता ४ ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी शिक्षकासमवेत नगर परिषद कार्यालय ब्रम्हपुरी येथे शैक्षणिक भेट दिली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्य प्रत्यक्ष पाहता यावे हा होता. सकाळी १२ वाजता सर्व विद्यार्थी शिक्षकांसोबत नगरपरिषद कार्यालयात पोहोचले. नगरपरिषदेची रचना, विविध विभागाचे कामकाज आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधा यांची सविस्तर माहिती तेथील कर्मचाऱ्याद्वारे देण्यात आली. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते बांधकाम, मालमत्ता कर व जन्म-मृत्यू नोंदणी यांसारख्या सेवांविषयी विद्यार्थ्यांना माहीती मिळाली. विद्यार्थ्यांना सभागृह विविध विभागाचे कार्यालय तसेच नोंदवही कक्ष दाखविण्यात आला. विद्यार्थ्यांना नागरी जबाबदारीची जाणीव झाली.

# ख्रिस्तानंद विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक ख्रिस्तानंद स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर पावना उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या निमित्याने वर्ग ८ वीच्या विद्यार्थ्यांनी भारतातील थोर वैज्ञानिकांची वेशभूषा साकारून त्यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली. मुख्याध्यापिका सिस्टर पावना यांनी सुद्धा राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्य सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली.

# महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळा येथे आयटी हेल्थ केअर विषयावर सेमिनार

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळा महाविद्यालयात दि.२८.२.२०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे यांनी या दिवसाचे महत्व आणि डॉ. सी.वी.रमण यांचे सायन्स या विषयावर असलेले समर्पण आणि लावलेले शोध या विषयी विस्तृत माहिती सादर केली. तसेच दि.२७.२.२०२६ ला मेहेर तुंडुलवार संचालक व कोफौंडर रेस इन्स्टिट्यूट यांचे आय टी हेल्थ केअर, मेडिकल कोडिंग व बिलिंग, क्लिनिकल रिसर्च,पीवी आणि सीडीएम या विषयांवर प्रभुत्व असलेल्या वक्त्याचे सुंदर व अप्रतिम असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना प्राप्त झाले.

या प्रसंगी डॉ.सुहास साकरकर यांनी मराठी भाषेचा उगम आणि प्रशासकीय कामात तसेच व्यक्तिक जीवनात मराठी भाषेचे स्थान या बद्दल सुंदर माहिती प्रस्तुत केली. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ.सचिन दुधे, डॉ.सुहास साकरकर, डॉ.अनुप बारसागडे, टी अँड पी ऑफिसर प्रो.पूजा घुटके इतर प्राध्यापक व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संचालन व आभार प्रदर्शन प्रा. घुटके यांनी केले.

**... QUOTES ...**

**"Don't be pushed around by the fears in your mind. Be led by the dreams in your heart."**

**- Roy T. Bennett**

**चारोळी**

आपण करतो ते इष्क<br>
दुसरे करतात ते लफडं...<br>
आपण करतो तत्त्वचर्चा,<br>
दुसरे करतात आरडा-ओरड...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये १० वी १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कुल येथे इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांचा



निरोप समारंभाचा कार्यक्रम दि. ०३ फेब्रुवारी २०२६ ला आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील आठवणींनां उजाळा देणारा हा कार्यक्रम सर्व उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला तसेच उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्वागत गीताने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रास्ताविकातून शाळेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा देण्यात आला. शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून मागदर्शन करताना यशासाठी केवळ गुण महत्वाचे नसून शिस्त, परिश्रम व नैतिक मूल्येही तितकीच आवश्यक आहेत, असे सांगून विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा सल्ला दिला. शाळेतील जेष्ठ शिक्षकांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा प्रवास मांडत त्यांच्यासोबत घालवलेल्या आठवणी सांगितल्या. विद्यार्थ्यांनीही आपले अनुभव व्यक्त करताना शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व शाळा व्यवस्थापनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या भाषणातून आपुलकी, प्रेम आणि भावनिकता दिसून आली. इ. १० वी च्या विद्यार्थ्यांद्वारे शाळेसाठी भेटवस्तू म्हणून फुलझाडे देण्यात आले.

निरोप समारंभ कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, समूहगीत विविध खेळांनी कार्यक्रमात रंगत आणली. इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना जीवनातील पुढील टप्प्यासाठी यश, सद्गुण आणि आत्मविश्वास या मूल्यांची शिदोरी देत निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन विद्यार्थ्यांद्वारे करण्यात आले. हा निरोप समारंभ विद्यार्थ्यांच्या जीवनात एक नवा अध्याय सुरू करणारा ठरला. कार्यक्रमाचे आयोजन वर्ग ९ वी चे शिक्षक व विद्यार्थ्यांद्वारे करण्यात आले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# बांधकाम कामगारांची नोंदणी आणि सेवा निःशुल्कच

## कोणत्याही फसवेगिरीला बळी न पडण्याचे आवाहन

ब्रम्हपुरी/का.प्र.

कामगार विभागामार्फत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकरण करण्यात येऊन त्यांना विविध योजनांचे लाभ दिले जातात. नोंदणी, नुतनीकरण व लाभाचे अर्ज संगणक प्रणालीवर सादर केल्यावर कर्मचारी व नोंदणी अधिकारी यांच्यामार्फत अर्ज निकाली काढले जातात. अर्ज मंजूर /नामंजूर असल्यास एसएमएस द्वारे कारणासह कामगारास कळविल्या जाते. सदरच्या सेवा मंडळामार्फत नि:शुल्क राबविण्यात येतात.

बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ थेट त्यांच्या बँकेच्या खात्यात देण्यात येतो. याकरीता कोणतेही शुल्क आकरण्यात येत नाही. ही सर्व कामे ऑनलाईन असून ते कोणत्याही एजेंट, दलाल, मध्यस्थ किंवा संघटनेच्या माध्यमातून करण्यात येत नाही. या ऑनलाईन कामाकरीता कोणीही पैशाची / कमिशनची लाचेची मागणी केल्यास मंडळाच्या जिल्हा कार्यालयास किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागास तक्रार करावी, अशा प्रकारच्या सुचना मंडळाच्या प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्र व तालुका कामगार सुविधा केंद्र येथे लावण्यात आलेल्या आहेत.

नोंदणी, नुतनीकरण व लाभासाठी अर्ज प्राप्त झाल्यावर कामगारास त्याने निवडलेल्या तारखेस कागदपत्र तपासणीसाठी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येते. लाभाच्या अर्जासंदर्भातील उपस्थित राहण्याबाबतच्या पत्रात देखील मंडळाकडून देण्यात येणारे लाभ हे विनामूल्य असून, कोणाकडूनही पैशाची अथवा लाचेची मागणी झाल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नि:शुल्क क्रमांक १०६४ अथवा दूरध्वनी क्रमांक अथवा ईमेल achwebmail@mahapolic.gov.in वर तक्रार नोंदवावी. त्यामुळे कामगारांनी कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त यांनी केले आहे.




Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# ब्रम्हपुरी न.प.चा बजेट म्हणजे...

(पान क्र. १ वरून)

लाईनच्या कामाचा आढावा घेण्यासाठी तातडीने विशेष सभा बोलवावी अशी मागणी सुद्धा त्यांनी यावेळी पत्रकार परिषदेतून केली.

या पत्रकार परिषदेला भाजपचे पदाधिकारी प्रा. सुयोग बाळबुद्धे, अरविंद नंदुरकर, प्रा. प्रकाश बगमारे, पवन जयस्वाल, प्रा. अशोक सालोटकर, तनय देशकर, राजू भागवत, साकेत भानारकर, अमित रोकडे, स्वप्नील अलदेवे आणि इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवजयंती उत्सवाच्या उरलेल्या निधीतून विद्यार्थ्यांना नोटबुकचे वाटप

ब्रम्हपुरी/का.प्र.

सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारीला शिवजयंती उत्सव समिती टिळकनगर यांनी नवेगाव



मक्ता येथे जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. त्यांनी १९ फेब्रुवारीला शिवजयंती साजरी केली. दरम्यान शिवजयंती करीता जमा करण्यात आलेल्या देणगीतून कार्यक्रम पार पाडला. या कार्यक्रमाच्या उरलेल्या निधीतून इतर कोणतेही फालतू काम न करता किंवा पार्टी न करता नवेगाव मक्ता येथील जि.प. शाळेतील विध्यार्थांना शालेय वस्तू भेट दिली.

यावेळी समितीचे अध्यक्ष राकेश भुते, उपाध्यक्षा सोपान धोटे, कोषाध्यक्ष राहुल शिंदीमेश्राम, सचिव रितेश ठाकरे, सहसचिव यश सहारे, मिथुन चौधरी, शुभम मेश्राम, सुहाग तलमले, कुणाल नाकतोडे आदींची उपस्थिती होती. या उपक्रमाबद्दल शिवजयंती उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404